दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १५ वा बुधवार दि.१२ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

## मोदींनी दुस-यांच्या घरातून खुर्च्या उधार घेऊन सत्ता थाटली



नवी दिल्ली : काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मंगळवार दि. ११ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार निशाणा साधला. नरेंद्र मोदींनी आधीची गॅरंटी पूर्ण केलेली नाही, पण आता ते दवंडी पिटत आहेत. आपल्या ट्विटर अकाऊंटवरून मल्लिकार्जुन खरगे यांनी याबाबत ट्विट केले आहे. लोकसभेच्या निवडणुकीत देशाने असे उत्तर दिले की, मोदी सरकारला दुस-यांच्या घरातून खुर्च्या उधार घेऊन सत्ता सांभाळावी लागत आहे. १७ जुलै २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ पर्यंत प्रत्येक भारतीयाच्या डोक्यावर छप्पर असेल, अशी गॅरंटी देशाला दिली होती.

ही गॅरंटी पोकळ ठरली. आता आधीची गॅरंटी पूर्ण झाल्यासारखी ३ कोटी घरे देण्याच्या बढाया मारत आहेत. पण देशाला खरी परिस्थिती माहिती आहे. या ३ कोटी घरांसाठी यावेळी कोणतीही कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही, कारण भाजपाने गेल्या दहा वर्षांत काँग्रेस-यूपीएपेक्षा १.२ कोटी कमी घरं बांधली. काँग्रेसने ४.५ कोटी घरं बांधली. त्याच वेळी भाजपाने (२०१४-२४) ३.३ कोटी घरे बांधली आहेत असे मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटले आहे.

खरगे यांनी दावा केला की, पंतप्रधान मोदींच्या आवास योजनेअंतर्गत, ४९ लाख शहरी घरांसाठी म्हणजे ६०% घरांसाठी बहुतेक पैसे जनतेने स्वत:च्या खिशातून भरले आहेत. तसेच सरकारी शहरी घराचीकिंमत सरासरी ६.५ लाख रुपये आहे. यामध्ये केंद्र सरकार केवळ दीड लाख रुपये देते. यामध्ये राज्ये आणि नगरपालिकांचा वाटा ४०% आहे. उरलेला भार जनतेवर येतो असे संसदीय समितीने म्हटले आहे.तीन कोटी घरांच्या बांधकामाला मंजुरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत प्रधानमंत्री आवास योजनाअंतर्गत तीन कोटी घरांच्या बांधकामासाठी सरकारी मदत मंजूर करण्यात आली आहे.

## शेतक-यांचे प्रश्न सोडविणा-यांच्या पदरात मतदानाचा दुष्काळ का?



सांगली : ऊस दरापासून बेदाण्याच्या प्रश्नापर्यंत शेतक-यांच्या प्रत्येक समस्येवर साखर सम्राट, सरकारी यंत्रणांशी संघर्ष करणा-या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदरात यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचा दुष्काळ वाट्याला आला. ज्यांच्यासाठी लढलो त्या शेतक-यांची मते गेली कुठे? अन्याय करणा-या साखर सम्राटांनाच मतांचे भरभरून दान का मिळाले? संघटनेच्या पदाधिका-यांनी आता निवडणूक लढवायची की नाही? असे मनाला अस्वस्थ करणारे सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिका-यांनी शेतकरी व सामान्य जनतेसमोर उपस्थित करून भावनांना वाट करून दिली आहे.संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी शेतक-यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, आम्ही काय गुन्हा केला म्हणून शेतक-यांनी या लोकसभा निवडणुकीत आम्हाला शिक्षा दिली. मला सांगली लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत फक्त साडेपाच हजार मते पडली. एखाद्या पंचायत समितीच्या उमेदवारालाही यापेक्षा जास्त मते मिळतात. निवडणुकीत साखर सम्राट निवडून आले आणि पराभूत झालेलेही साखर सम्राटच आहेत. मते मिळविण्यासाठी एकतर साखर सम्राट हवे किंवा वारसदार हवे, असा या निकालाचा अर्थ घायचा का? तुम्ही आमचे प्रश्न सोडवा पण मत मागायला येऊ नका, आम्ही तुम्हाला मत देणार नाही, आमचे मत आम्ही वाया घालवत नाही, असाच संदेश या निवडणुकीचा असावा, अशी आमची भावना झाली आहे.राजू शेट्टींनाही का नाकारले? हातकणंगले मतदारसंघात राजू शेट्टी यांनाही मतदारांनी नाकारले. केवळ पावणे दोन लाख मते त्यांना पडली आहेत. जो उमेदवार पाच वर्षांत मतदारसंघात फिरकला नाही व ज्यांच्याविरोधात 'खासदार दाखवा आणि हजार रुपये मिळवा' असे फलक लोकांनी लावले तेच निवडून आले. शेतक-यांसाठी लढणा-यांना का नाकारले गेले, याचे उत्तर सापडत नाही. संघटनेचे शेतकरी मतदारांना सवाल - ऊस दरासाठी गव्हाणीत उड्या मारल्या, हा गुन्हा केला का? - बुडालेली ७० कोटींची ऊस बिले काढण्यासाठी संघर्ष केला. हा गुन्हा होता का? - हजार रुपयांचा साखरेचा भाव तीन हजारांवर नेला, हा गुन्हा म्हणायचा का? - बेदाण्याचा पोषण आहारात समावेश करण्यासाठी प्रयत्न केला, हाच गुन्हा का? - कडकनाथ घोटाळाप्रकरणी तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यावर कोंबड्या फेकल्या, हा गुन्हा केला काय?

## सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा विलास सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाच्या वतीने सत्कार खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या विजयाचा केला आनंद साजरा



लातूर प्रतिनिधी : मंगळवार दि. ११ जून २०२४ लातूर लोकसभा निवडणुक नुकतीच पार पडली आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून डॉ. शिवाजी काळगे हे ६२ हजार मतांनी विजयी झाले आहेत. मराठवाडयासह महाराट्रात काँग्रेस पक्षाला घवघवीत यश मिळाले आहे. यामध्ये काँग्रेसचे जेष्ठ नेते राज्याचे सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनात, राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासरावजी देशमुख यांनी मोलाचे योगदान दिले आहे. या बददल विलास कारखाना संचालक मंडळाने आनंद व्यक्त करून राज्याचे सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा सत्कार केला. विलास सहकारी साखर कारखान्याच्या सर्व संचालकांनी मंगळवार दि. ११ जून रोजी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांची आशियाना निवासस्थानी भेट घेऊन व्हा.चेअरमन रविंद्र काळे आणि संचालकांनी आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांचा सत्कार केला. यावेळी माजी आमदार त्रयबंक भिसे, व्हा. चेअरमन रविंद्र काळे, संचालक सर्वश्री अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, रंजीत पाटील, गोविंद डुरे, सुभाष माने, संजय पाटील खंडापूरकर, ज्ञानोबा पडीले, तालुका काँग्रेस अध्यक्ष सुभाष घोडके आदी उपस्थित होते.

## क्षमतेपेक्षा अधिक प्रवेश देणार्या महाविद्यालयांवर कारवाई करा



लातूर : इयत्ता ११वी व १२वी विज्ञान बोर्ड ग्रुपिंगसाठी ग्रामीण भागातील सामूहिक कॉपी करणार्या महाविद्यालयांवर व परीक्षा केंद्रांवर कारवाई करावी आणि क्षमतेपेक्षा अधिक प्रवेश देणार्या महाविद्यालयांना निर्बंध घालावेत, अशी मागणी नवीन शैक्षणिक धोरण जनजागृती मंचच्यावतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर व शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

देशभरात लातूरने शिक्षण क्षेत्रात आपला एक आगळा वेगळा पॅटर्न निर्माण केला आहे. येथील शिक्षण संस्था व विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमातून हे यश मिळाले आहे. मात्र, मागील काही वर्षांपासून ११वी व १२वी विज्ञान शाखेसाठी लागणारी ग्रुपिंग मिळवून देऊ, असे आमिष दाखवून ग्रामीण भागातील काही महाविद्यालये विद्यार्थी व पालकांची दिशाभूल करीत आहेत. यामुळे प्रवेशासाठी शहरातील अनेक विद्यार्थी ग्रामीण भागात जात आहेत. ही बाब 'लातूर पॅटर्न'साठी धोकादायक आहे. परीक्षेच्या बाबतीत सवलती देऊन मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना सामूहिक कॉपी करून उत्तीर्ण केले जात आहे. यामुळे शहरी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. यातून पालकांचीही आर्थिक पिळवणूक होत आहे. त्यामुळे सामूहिक कॉपी करणार्या महाविद्यालयांवर लक्ष ठेवून तसेच चुकीचा प्रकार परीक्षा केंद्रांवर होणार नाही याची दक्षता घ्यावी. सामूहिक कॉपी करण्यात येणार्या महाविद्यालयांची मान्यता रद्द करावी, महाविद्यालयाच्या संच मान्यतेपेक्षा अधिक प्रवेश देऊ नये. विभागीय शिक्षण मंडळ व शिक्षण उपसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती स्थापन करून याची चौकशी करावी, अशी मागणी नवीन शैक्षणिक धोरण जनजागृती मंचच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर कालिदास माने, प्राचार्य डी. एन. केंद्रे, पांडुरंग देडे, प्राचार्य प्रशांत घार, प्रा. एकनाथ पाटील, प्रा. एस. टी. बिरादार, प्राचार्य जी. एन. शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य संजय गवई, प्राचार्य सतीश मारकोळे, उपप्राचार्य दादासाहेब सरवदे, संतोष ढोरमारे, प्रा. ओंकार होनराव, एस. एन. वाडीकर, व्ही. एस. स्वामी आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

## घाईमध्ये निमंत्रण द्यायचे राहून गेले



मुंबई : लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर राज्यभर मनसे नेत्यांनी महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केला. प्रत्यक्षात राज ठाकरे यांनी मैदानात उतरत महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतल्या होत्या. मात्र मनसेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण मिळाले नसल्याची खंत मनसे नेत्यांनी व्यक्त केली. मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी शपथविधीसाठी आम्हाला आमंत्रण मिळाले असते तर आनंद झाला असता असे म्हटले.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर रविवारी नरेंद्र मोदी यांनी तिस-यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्याला देशभरातील मान्यवरांसह परदेशातील प्रमुख पाहुणे देखील उपस्थित होते. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांसह विरोधी पक्षाच्या नेत्यांनाही या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले होते. मात्र महाराष्ट्रात महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणा-या मनसेला या सोहळ्यासाठी निमंत्रित न केल्याने मनसे नेत्यांमध्ये नाराजी दिसून येत आहे.

या सगळ्या प्रकरणावर आता भाजप नेते आणि मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी भाष्य केले आहे. ही गोष्ट मी वरिष्ठांच्या कानावर टाकणार असल्याचे सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. कधी कधी घाईमध्ये निमंत्रण देताना जी यादी करतात तिथे कधी कधी आपले मित्र आहेत त्यांना निमंत्रण द्यायचे राहून जाते. केंद्रीय पक्षाने याची नोंद घ्यायला हवी. आपल्याला जेव्हा एखादा मित्र मैत्रीचा हात पुढे करतो तेव्हा असे होऊ नये याची काळजी घ्यायला हवी, असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

## रोहित पाटील यांची औसा युवक काँग्रेस विधानसभा प्रभारीपदी निवड



लातूर - लातूर जिल्हा युवक काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष रोहित पाटील यांच्या कार्याची दखल घेवून त्यांची औसा युवक काँग्रेस विधानसभा प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मणिपूरकडे लक्ष देण्याची गरज



नागपूर : प्रतिनिधी मागील काही महिन्यांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. दोन समुदायांतील वादामुळे तेथे कायम तणावाचे वातावरण आहे. हिंसाचाराच्या घटनांमध्ये अनेक लोकांचा मृत्यूही झाला होता. तसेच अनेकदा जाळपोळीच्या घटनाही घडल्या आहेत. यात सरकारने लक्ष घातले पाहिजे असे म्हणत मणिपूरमधील या परिस्थितीबाबत सोमवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही अप्रत्यक्षपणे मोदी सराकरला लक्ष्य केले.

दरम्यान, नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर आयोजित कार्यकर्ता विकास वर्गाच्या समारोपीय सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी 'निवडणुकीत स्पर्धा करा पण मर्यादा पाळा' असे म्हणत सत्ताधा-यांचे कान टोचले आहेत. १० वर्षे शांत राहिलेले मणिपूर गेल्या वर्षापासून अशांत आहे. गेले दहा वर्षे तिथे शांतता होती. अचानक तिथे अशांतता घडली. तिथे जे काही झाले, ते घडले आहे की घडवले आहे, असा प्रश्न आहे.

देशात एनडीएचे सरकार परत आले आहे. देशात गेल्या १० वर्षांत बरेच काही चांगले झाले. आर्थिक क्षेत्रात, संरक्षण क्षेत्रात आमची प्रगती झाली. मात्र, अजूनही प्रश्न संपलेले नाहीत. निवडणुकीत जो काही अतिरेक झाला, त्याच्या पुढे जाऊन आता आम्हाला विचार करायचा आहे, असेही भागवत यांनी सांगितले.

भागवत पुढे म्हणाले, प्रचारात ज्या पद्धतीने चुकीचे वक्तव्य करण्यात आले, अशा वक्तव्यांमुळे समाजात तेढ निर्माण होईल, याचा देखील विचार करण्यात आला नाही. यामध्ये आम्हाला नाहक ओढण्यात आले.

मणिपूर भारताचा महत्त्वाचा भाग : सुप्रिया सुळे गेल्या वर्षभरात मणिपूरच्या प्रश्नावर अनेकदा चर्चा झाली आहे. मणिपूर हा आपल्या देशाचा महत्त्वाचा भाग आहे. तिथल्या महिला, मुले, पुरुष हे सगळे भारतीय आहेत. कालपरवाच मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यावरही हल्ला झाला आहे. याचा अर्थ काही तरी चुकत आहे. मणिपूरच्या प्रश्नावर संसदेत चर्चा व्हावी, अशी मागणी आम्ही अनेकदा केली आहे. मात्र, केंद्र सरकारने यावर चर्चा केली नाही. हे सरकार मणिपूरचा म देखील बोलायला तयार नाही. मणिपूर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, मग तिथल्या लोकांना अशी वागणूक का दिली जात आहे'', असा प्रश्न करत सुप्रिया सुळे यांनी सरकारची कानउघाडणी केली आहे.

## संपादकीय....

# सत्ता संतुलन राखण्याचे आव्हान

भारतीय शासन प्रणालीत परराष्ट्र धोरण आखताना पंतप्रधान कार्यालयाला विशेष मुभा असते. यामुळेच पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंपासून पंतप्रधान नरेंद्र मोदींपर्यंत परराष्ट्र धोरणाबाबतची परंपरा कायम राहिली आहे. मोदींनी परराष्ट्र धोरणात विशेष रस दाखवत वेग देण्याचा प्रयत्न केला. भूतकाळातील निर्णयांपेक्षा वेगळे आणि भविष्याच्या दृष्टीने काही धाडसी निर्णय घेतले आणि त्याचा भारताला व्यापक रूपाने लाभ मिळालादेखील आहे. तिसर्या कार्यकाळात मोदी यांनी देशाला तिसरी मोठी आर्थिक शक्ती करण्याची हमी दिली आहे आणि ते भारताला विकसित देश करण्यासाठीही कटिबद्ध आहेत.

लोकसभा निवडणूक निकालांनंतर केंद्रात 'रालोआ'चे नवीन सरकार स्थापन झाले असून, नरेंद्र मोदी सलग तिसर्यांदा देशाचे पंतप्रधान झाले आहेत. अर्थात, यापूर्वीच्या दोन कालावधीत संपूर्ण बहुमताने सरकार चालवताना तिसर्या टप्प्यात मात्र त्यांना घटक पक्षांच्या विश्वासावर सरकारचे नेतृत्व करावे लागेल. याचा परिणाम पूर्वीच्या कार्यकाळात सुरू असलेल्या विकासकामांवर होणार नाही, हे मोदी यांच्या निकालांनंतरच्या भाषणातून स्पष्ट झाले. राजकीय दृष्टिकोनातून जनमताच्या कौलाचा वेगवेगळा अर्थ काढला जाऊ शकतो. गेल्या दहा वर्षांप्रमाणे याही कार्यकाळात परराष्ट्र धोरणाच्या आघाडीवर भारताच्या भूमिकेत सातत्यपणा दिसून येईल व त्यात पंतप्रधान मोदी यांच्या कार्यशैलीची छापही दिसेल. भूतकाळातील निर्णयांपेक्षा वेगळे व भविष्याच्या दृष्टीने काही धाडसी निर्णय घेतले आणि त्याचा भारताला व्यापक रूपाने लाभ मिळालाही आहे. परराष्ट्र धोरण प्रामुख्याने राजकीय दबावापासून मुक्त असते. आघाडी सरकारमध्येही अशीच स्थिती राहू शकते. अपवादात्मक स्थितीत आघाडीतील घटक पक्षांच्या दबावामुळे काही तडजोडी कराव्या लागतील. उदा. डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या काळात भारत- बांगला देश यांच्यातील नदीच्या पाण्यासंदर्भातील कराराला गती देण्याचा प्रयत्न झाला; मात्र घटक पक्ष तृणमूल काँग्रेसने या कराराला खोडा घातला व त्यामुळे सरकारला मागे जावे लागले. कधी-कधी द्रमुकसारख्या पक्षाचा दबाव हा भारताच्या श्रीलंकेच्या धोरणांवर पाहावयास मिळतो; मात्र अशा प्रकारचा दबाव मोदी सरकारवर दिसण्याची शक्यता नाही, कारण भाजप बहुमतापासून फार दूर नाही व तो पाठिंब्यासाठी जेडीयू आणि तेलगू देसमसारख्या पक्षांवर काही प्रमाणात अवलंबून राहील, जेणेकरून शेजारील देशांसमवेत निर्णय घेताना कोणताही संघर्ष उभा राहणार नाही.

भारताच्या परराष्ट्र धोरणात चीन व पाकिस्तानला विशेष महत्त्व आहे. या देशांना संयमाने व दृढतेने हाताळणे हे मोदी सरकारचे वैशिष्ट्य राहिले आहे. पाकिस्तानविरुद्धचे सर्जिकल स्ट्राईक असो, लाँचपॅडवरील हवाई हल्ले असो, त्याचवेळी चीनविरुद्ध डोकलाम व लडाखसारख्या उदाहरणांचा उल्लेख करता येईल. अर्थात, आघाडीमुळे मोदी यांचे राजकीय पाठबळ थोडे कमकुवत राहत असताना परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत भारताचे धोरण कसे राहते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. भाजपला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने व आघाडीच्या जोरावर मोदी पंतप्रधान होत असल्याने कदाचित चीन व पाकिस्तानसारखे देश मोदींना कमकुवत समजतील किंवा करण्याचा प्रयत्न करतील किंवा उपद्रव करतील. अशावेळी त्यांच्या कुरापतीला पूर्वीप्रमाणेच उत्तर देणे गरजेचे आहे.पाकिस्तान व चीनच्या बाबतीत भूमिका घेताना केंद्रात सरकार कोणतेही असो, त्याला व्यापक पातळीवर राजकीय पाठबळ मिळाले आहे. मग पूर्व बांगलादेश मुक्ती संग्राम असो, कारगिल युद्ध असो, या काळात तत्कालीन विरोधी पक्षांनी सरकारला मदत केली आहे. त्यामुळे चीन व पाकिस्तानच्या बाबतीत आतापर्यंतच्या पंतप्रधानांनी घेतलेल्या निर्णायक भूमिकेची परंपरा यापुढेही सुरूच राहील. तिसर्या कार्यकाळात पंतप्रधान मोदी यांच्यासमोरचे आव्हान म्हणजे आंतरराष्ट्रीय घटनांमुळे निर्माण होणार्या अडचणीतून मार्ग काढत ताळमेळ साधणे. परराष्ट्र धोरण हा एक संवेदनशील विषय असून, त्यावर परिणाम करणार्या अनेक घटकांवर नियंत्रण ठेवता येत नाही; परंतु संतुलनाचे समीकरण साधणेही तितकेच महत्त्वाचे राहते.

जागतिक नेत्यांसमवेतच्या चांगल्या संबंधांच्या माध्यमातून मोदी हे राष्ट्रीय हित साधण्यात यशस्वी ठरले आहेत; पण सातत्याने बदलणारी जागतिक समीकरणे पाहता त्यात देशहित साधणे आणि सत्ता संतुलन राखणे हे कठीण काम आहे. एकीकडे रशिया आणि युक्रेन युद्ध थांबण्याचे नाव घेत नाही आणि दुसरीकडे पश्चिम आशियामध्ये संघर्षात नवनवीन तणावाची भर पडत आहे. अमेरिका व चीनमध्येही ताणाताणी सुरूच आहे. यादरम्यान भारताने रशियाबरोबरच त्याचे विरोधक असलेल्या पश्चिम देशांसमवेतही चांगले संबंध ठेवले आहेत. पश्चिम आशियातील संघर्षात भारताने इस्रायलला एकटे सोडले नाही व त्याचे विरोधक देशांशीही ताळमेळ ठेवलेला आहे. अशावेळी मोदींसाठी भारत-पश्चिम आशिया आणि युरोप आर्थिक कॉरिडॉर स्थापन करण्यासाठी जादा प्रयत्न करावे लागतील. या कॉरिडॉरवर दिल्लीतील जी-२० परिषदेत एकमत झाले आहे.निवडणूक काळातच सरकारने इराणच्या चाबहार बंदरासाठी कराराला अंतिम रूप दिले. अमेरिकेने इराणवर अनेक निर्बंध घातलेले असतानाही भारताने हा करार तडीस नेला, हे विशेष.

# यंदा यूट्यूब वाहिन्या जिंकल्या, म्हणून मुख्य माध्यमं हरली?




२०२४च्या लोकसभा निवडणुकीच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट्य म्हणजे यूट्यूबर्सनी उमटवलेला ठसा. अपवाद वगळता इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर पत्रकारिताधर्म विसरल्याचा आरोप होत असताना, निवडणुकीसंबंधी चर्चा किंवा संपादकीय ऐकण्यासाठी जनतेने मोठ्या प्रमाणात यूट्यूब वाहिन्यांना प्राधान्य दिले. त्यामध्ये रविशकुमार यांच्यासारख्या नावाजलेल्या, अतिशय लोकप्रिय आणि विश्वसनीय पत्रकाराच्या वाहिनीपासून 'सत्य हिंदी'सारख्या काही पत्रकारांनी एकत्र येऊन सुरू केलेल्या उपक्रमापर्यंत अनेक व्यासपीठांचा समावेश आहे.

पुण्यप्रसून वाजपेयी, अजित अंजुम हे स्वतंत्र पत्रकार; सत्य हिंदी, ४ पीएम, न्यूजलाँड्री, द वायर, द रेड माईक, द पब्लिक इंडिया यासारख्या वाहिन्यांनी मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांना आकर्षित केले. त्याशिवाय डीकोडरच्या माध्यमातून पुन्हा एकदा प्रेक्षकांसमोर आलेले ज्येष्ठ पत्रकार डॉ. प्रणॉय रॉय यांना ऐकणे हाही अनेक प्रेक्षकांसाठी समाधानकारक अनुभव होता. या पत्रकारांच्या एकेका कार्यक्रमाला मिळणारे लाखो व्ह्यूज एकाच वेळी त्यांची विश्वसनीयता आणि मुख्य माध्यमांची ढासळणारी विश्वासर्हता अधोरेखित करतात. त्याशिवाय मराठीमध्ये प्रशांत कदम यांची स्वतंत्र वाहिनी, द इंडी जर्नल, थिंक बँक यांचीही कामगिरी उल्लेखनीय ठरली. या वाहिन्यांवर चर्चात्मक कार्यक्रमांना चांगला परिणाम मिळाला. प्रत्यक्ष दौरे करून माहिती मिळवणाऱ्या पत्रकारांशी चर्चा, स्थानिक व अनुभवी पत्रकारांच्या मुलाखती किंवा थेट लोकांमध्ये जाऊन सर्वसामान्यांची मते जाणून घेणे असे साधारण या कार्यक्रमांचे स्वरूप होते. रविशकुमार, वाजपेयी, आनंदवर्धन सिंह यांनी ठाम पण संयत शैलीत विविध घटनांचे अनेक पैलू समोर आणले. तर 'द वायर'च्या आफसा खानम शेरवानी, न्यूजक्लिकचे अभिसार शर्मा यांनी आक्रमकपणे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. विशेषतः शेरवानी यांनी मुस्लीम समाजाचे प्रश्न ज्या तळमळीने मांडले ते महत्त्वाचे मानले पाहिजे.

व्यवसायाने पत्रकार नसलेल्या- तरीही प्रभावी ठरलेल्या अशा एका यूट्यूबरचा उल्लेख आतापर्यंत केलेला नाही, तो अर्थातच ध्रुव राठी! अनेक वर्षांपासून विविध विषयांवर कार्यक्रम करणाऱ्या राठीने गेल्या काही महिन्यांपासून भारताच्या राजकारणावर लक्ष केंद्रित केले. एकेका कार्यक्रमाला कोट्यवधी प्रेक्षक मिळवणाऱ्या मोजक्या यूट्यूबरमध्ये त्याचा समावेश होतो. त्याचे तब्बल २.२० कोटींपेक्षा जास्त सबस्क्रायबर्स आहेत. त्याने मुख्यतः सत्ताधारी पक्षाला अडचणीत टाकणारे अनेक कार्यक्रम केले. निवडणूक रोखे घोटाळा, देशाची हुकूमशाहीकडे होऊ घातलेली वाटचाल, व्हॉट्सपसारख्या समाजमाध्यमांवरून पसरवल्या जाणाऱ्या अफवा, मोदींची प्रतिमानिर्मिती असे अनेक मुद्दे तो उपस्थित करत राहिला. याच यादीत आकाश बॅनर्जीची वाहिनी, लल्लनटॉप यांचाही समावेश करता येईल.

ध्रुव राठी असो किंवा वर उल्लेख केलेले यूट्यूब पत्रकार, या सर्वांनी प्रेक्षकांची जितकी वाहवा मिळवली तितकाच समाजमाध्यमांवर जल्पकांचा- 'ट्रोल'चा त्रासही सहन केला. वैयक्तिक शेरेबाजीपासून थेट हल्ल्यांच्या धमक्यांपर्यंत त्यांचा सर्व प्रकारचा ऑनलाईन छळ करण्यात आला. मात्र त्याला पुरून उरत हे पत्रकार आपले काम करत राहिले. थोडे बारकाईने पाहिले तर एखाद दुसरा अपवाद वगळता, यापैकी बहुसंख्य पत्रकार गेल्या चार-पाच वर्षांमध्ये मुख्य माध्यमांमधून बाहेर पडलेले किंवा त्यांना बाहेर पडण्यास भाग पाडण्यात आले, असे आहेत. त्यांना यूट्यूबवर मिळालेले यश हे दुसरीकडे सध्याच्या मुख्य माध्यमांची मर्यादा दाखवून देणारेही आहे.

मुख्य इलेक्ट्रॉनिक माध्यमांची, विशेषतः राष्ट्रीय, काय अवस्था आहे ते वेगळे सांगायला नको. पूर्णपणे सरकारधार्जिणी पत्रकारिता (?) करण्याच्या धोरणामुळे भल्याभल्या पत्रकारांची तारांबळ उडताना प्रेक्षकांनी पाहिली. सरकारला अडचणीत आणणारे प्रश्न टाळायचे, पंतप्रधान जेव्हा कधी मुलाखत देतील तेव्हा त्यांना केवळ प्रतिमानिर्मिती करणारे प्रश्न विचारायचे, त्यांच्या उत्तराला प्रतिप्रश्न करायचे नाहीत या अलिखित/ अघोषित धोरणामुळे त्यांची मुलाखत घेणाऱ्या पत्रकारांची कुचंबणाही झाल्याचे पाहायला मिळाले.

निवडणूक प्रचार सुरू असताना एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना नरेंद्र मोदींनी एक वक्तव्य केले. ते म्हणाले की, जोपर्यंत गांधींवरचा सिनेमा आला नव्हता तोपर्यंत बाहेरच्या जगाला गांधीजी कोण हे माहीतच नव्हते. इतका धक्कादायक दावा भारताच्या पंतप्रधानपदी दहा वर्ष असलेली व्यक्ती कशी काय करू शकते असा प्रश्न मुलाखत घेणाऱ्या पत्रकारांना पडला नसेल का? पत्रकारांचा पडलेला चेहरा सांगत होता की त्यांना हा प्रश्न पडला आहे, पण मोदींना अडवण्याची किंवा त्यांची तथ्यात्मक चूक दुरुस्त करण्याची एक तर त्यांची हिंमत नव्हती किंवा कोणत्याही परिस्थितीत मोदींना प्रतिप्रश्न करायचा नाही याचे त्यांना स्पष्ट आदेश असावेत. नंतर या वक्तव्याबद्दल पंतप्रधानांवर समाज माध्यमांमधून टीका झाली, खिल्लीही उडवली गेली; तो भाग वेगळा. परंतु या कसरतीमध्ये मुलाखतकार पत्रकारांची उरलीसुरले विश्वासार्हता आणखी खालावली.

अशा प्रकारांमुळे प्रेक्षक पर्यायी माध्यमांकडे वळत आहेत, अनेकजण स्वतःचे यूट्यूब चॅनेल काढत आहेत. यामध्ये काही धोके सुद्धा आहेत. जसे की हातामध्ये साधा मोबाइल फोन असला तरी कोणालाही पत्रकार होणे शक्य आहे, असा गैरसमज होऊ शकतो. यूट्यूब ब्लॉगरने एखादा विषय घेऊन त्यावर भाष्य करणे किंवा अन्य तज्ज्ञांशी चर्चा करून तो विषय समजावून सांगणे हा पत्रकारितेचा एक भाग झाला. संपूर्ण पत्रकारिता नव्हे. बातमीदारी हा वृत्तवाहिन्यांचा कणा आहे. बातम्या नसतील, तर केवळ विश्लेषण आणि चर्चा ऐकण्यात लोक वेळ वाया घालवणार नाहीत. वृत्तपत्रांची आणि वृत्तवाहिन्यांची ही ताकद यूट्यूब ब्लॉगर्सकडे नाही. त्यामुळेच, मुख्य प्रवाहातील माध्यमांचे आता केवळ काही दिवसच उरले आहेत असे मुळीच नाही. हे क्षेत्र खूप मोठे आहे, त्यामध्ये विविध व्यासपीठ आहेत आणि सत्य, तथ्य व प्रश्न यावर ते आधारलेले आहे. ही सर्व माध्यमे एकमेकांना पूरक म्हणून काम करू शकतात. अट एकच आहे, पत्रकारिता धर्म पाळण्याची!

# निवडणूक निकाल – परकीय गुंतवणूकदारांच्या नजरेतून

मतदानोत्तर चाचण्यांच्या अंदाजांमुळे अतोनात वर जाऊन निवडणूक निकालांच्या दिवशी कोसळलेला शेअर बाजार पूर्वपदावर आला; पण परकीय गुंतवणूकदार संस्थांनी त्यापासून अंतर का राखले असावे? भारतीय भांडवल बाजाराच्या इतिहासात नाट्यपूर्ण घडामोडींनी गच्च भरलेला मागचा आठवडा होता. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी, निकालांच्या अंदाजांवर स्वार होऊन मुंबईतील शेअर बाजाराचे निर्देशांक ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचले. दुसऱ्या दिवशी, खरे निकाल जाहीर झाल्यावर, उंच कड्यावरून खोल दरीत ढकलून दिल्यासारखे कोसळले देखील. पुढच्या तीन दिवसात, नरेंद्र मोदीच पंतप्रधान होणार याची स्पष्टता येऊ लागल्यावर, पुन्हा सावरले. आठवड्याच्या शेवटच्या दिवशी, 'सेन्सेक्स' कोसळण्यापूर्वी ज्या अंकांवर होता त्याच पातळीवर बंद झाला. या सगळ्या घडामोडींना फोडणी दिली यांच्या आरोपांनी. शेअर बाजारातील वादळी बदल हा एक घडवून आणलेला घोटाळा असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

शेअर बाजारातील गुंतवणूकदारांना कोणत्याही प्रकारची अनिश्चितता आवडत नाही. ते सैरभैर होतात. त्यांच्या दृष्टीने सर्व प्रकारच्या अनिश्चिततांमध्ये सर्वात गंभीर असते ती राजकीय अनिश्चितता; आणि त्यातून निर्माण होणारी आर्थिक धोरणाबाबतची धरसोड. मोदी राजवटीची दहा वर्षे कॉर्पोरेट क्षेत्र आणि भांडवल बाजार-स्नेही नक्कीच होती. त्यामुळे याच काळात 'सेन्सेक्स' २५० टक्क्यांनी वधारला आणि शेअर बाजाराचे एकत्रित बाजारमूल्य पाच ट्रिलियन डॉलर्स झाले. साहजिकच मोदी राजवट भविष्यात देखील सुरूच राहावी अशीच गुंतवणूकदारांची आंतरिक इच्छा होती. मोदी तिसऱ्यांदा एकहाती बहुमत कमावतील असे मार्केटमधील सर्व गुंतवणूकदारांनी जवळपास गृहीतच धरले होते. निवडणूक निकालांनी ते गृहीतक खोटे ठरवले.

गुंतवणूकदारांच्या या आंतरिक इच्छेला तसेच सबळ कारण होते. दहा वर्षांत मोदी राजवटीचे आर्थिक तत्त्वज्ञान आणि अंमलबजावणी क्षमता याबाबत एक प्रकारचा विश्वास शेअर मार्केट गुंतवणूकदारांमध्ये तयार झाला होता. नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधान होणार असल्यामुळे आर्थिक धोरणात / अंलबजावणीत सातत्य राहणार होते. त्यापैकी नरेंद्र मोदीच पंतप्रधान राहणार हे खरे ठरले. पण आर्थिक धोरणांतील सातत्याबद्दल अजूनही साशंकता आहे. कारण या खेपेला मोदींचे हात पूर्वीसारखे 'मोकळे' नसतील. ते 'एनडीए' आघाडीतील मोठ्या घटक पक्षांनी बांधलेले असतील. यामुळे सर्वच, भारतीय आणि परकीय, गुंतवणूकदारांच्या चिंता वाढल्या आहेत.




सर्व गुंतवणूकदारांच्या चिंता भारतीय शेअर मार्केटमधील सर्व गुंतवणूकदारांच्या दोन प्रमुख चिंता आहेत : (अ) संरचनात्मक आर्थिक सुधारणा: शेअर मार्केट असेच वर्धिष्णु राहण्यासाठी मोठ्या भारतीय कंपन्यांची विक्री आणि नफ्याची पातळी सतत वाढण्याची गरज आहे. ती तशी वाढणार की नाही हे काही संरचनात्मक आर्थिक सुधारणांवर अवलंबून असणार आहे. उदा. जमीन, शेती, नैसर्गिक संसाधने, कामगार कायदे, सार्वजनिक उपक्रमांचे खासगीकरण इत्यादी. हे सारे अर्थातच राजकीय / सामाजिकदृष्ट्या अतिशय संवेदनशील विषय आहेत. नवीन 'एनडीए'चे सरकार आघाडीतील ज्या प्रमुख पक्षांवर अवलंबून आहे, ते पक्ष वरील संरचनात्मक आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत मोदींना साथ देतील की नाही, ही पहिली चिंता. (ब) अर्थसंकल्पीय ताण : निवडणूक निकालांच्या काही विश्लेषणांनुसार ग्रामीण व शहरी भागातील गरीब मतदारांनी, त्यांच्या राहणीमानासंदर्भातील अपेक्षा मोदी राजवटीत पुऱ्या न झाल्यामुळे भाजपला धडा शिकवला आहे. असे असेल तर भविष्यातील निवडणुका जिंकण्यासाठी मोदी सरकारला ग्रामीण / शहरी गरिबांची क्रयशक्ती आणि राहणीमान वाढवणाऱ्या योजनांसाठी, वाढीव अर्थसंकल्पीय तरतुदी करणे भाग पडेल. त्या प्रमाणात पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी अर्थसंकल्पीय वित्तीय स्रोत आक्रसतील. त्याचा ताबडतोबीचा परिणाम मोठ्या भारतीय कंपन्यांच्या विक्री आणि नफ्यावर होऊ शकतो.

परकीय गुंतवणूकदारांचा वेगळा दृष्टिकोन एक काळ असा होता की भारतातील शेअर बाजार परकीय गुंतवणूकदार संस्थांच्या (एफआयआय) गुंतवणूक / निर्गुंतवणुकीप्रमाणे वर वा खाली होत असे. अनेक कारणांमुळे त्यात मूलभूत बदल झाले आहेत. भारतातील देशांतर्गत गुंतवणूक संस्था (विमा, म्युच्युअल फंड) आणि नागरिक गुंतवणूकदार (रिटेल इन्व्हेस्टर) शेअर बाजाररूपी गाडीच्या ड्रायव्हिंग सीटवर आले आहेत आणि परकीय गुंतवणूकदार संस्था शेजारच्या सीटवर. याचे कारण भारतीय गुंतवणूकदार संस्था अधिक सामर्थ्यवान आणि परकीय गुंतवणूकदार संस्था कमकुवत झाल्या आहेत हे नक्कीच नाही. परकीय गुंतवणूकदारांचा भारतीय शेअर मार्केटकडे बघण्याचा दृष्टिकोन भिन्न असण्याची शक्यता अधिक आहे. याचे प्रतिबिंब आकडेवारीत देखील पडलेले दिसते.

२०२३ सालात परकीय गुंतवणूकदार संस्थांनी, विक्री केलेले शेअर्स वजा करता, भारतीय शेअर मार्केटमध्ये सुमारे दीड लाख कोटी रुपयांच्या भांडवलाची गुंतवणूक केली होती. पण २०२४च्या सुरुवातीपासून त्यांनी खरेदीची रक्कम वजा करता, सुमारे ३०,००० कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली आहे. परिणामी भारतीय कंपन्यांमधील परकीय गुंतवणूकदार संस्थांची सरासरी मालकी, जी २०२० सालात २० टक्के होती ती सध्या १६ टक्क्यांवर घसरली आहे. डेरिव्हेटिव्ह सेगमेंटमध्ये तर परकीय गुंतवणूकदार संस्थांनी 'मंदी'वाल्यांची टोपी घातली आहे. मागच्या आठवड्यात या संस्थांच्या 'शॉर्ट' इंडेक्स फ्युचर्स कॉंट्रॅक्ट्सचा आकडा २,८०,००० वर पोहोचला आहे. त्यातून भारतीय शेअर मार्केट नजीकच्या काळात खाली जाऊ शकते असा त्यांचा कयास असावा असा अर्थ काढता येऊ शकतो. परकीय गुंतवणूकदार संस्थांच्या भिन्न दृष्टिकोनाची मुळे अंशत: त्यांच्या भिन्न गुंतवणूक निकषांमध्ये असू शकतात.

परकीय गुंतवणूकदारांचे भिन्न निकष एखाद्या देशातील शेअर्समध्ये गुंतवणूक करताना परकीय गुंतवणूकदार संस्थांचे दोन भिन्न निकष असतात जे देशांतर्गत गुंतवणूकदारांना लागू पडत नाहीत : (अ) विनिमय दर : एखाद्या देशात भांडवल आणताना व बाहेर नेताना परकीय भांडवलाला त्या देशाच्या चलनाची अनुक्रमे खरेदी व विक्री करावी लागते. या दोन्ही वेळच्या विनिमय दरात विपरीत फरक असेल तर गुंतवणूकदाराने कमावलेला भांडवली नफा कमी होतो. साहजिकच त्यांना विनिमय दरात स्थिरता हवी असते. भारताचा रुपया सध्यातरी बऱ्यापैकी स्थिर आहे ही त्यांच्या दृष्टीने जमेची बाजू आणि (ब) पोर्टफोलिओ : परकीय गुंतवणूकदार संस्था त्यांच्याकडे असणारे गुंतवणूक फंड एकाच वेळी अनेक देशात गुंतवतात. त्याला 'पोर्टफोलिओ' असे म्हटले जाते. उदा. भारत, चीन, व्हिएतनाम, फिलिपाइन्स असे देश एकाच 'विकसनशील बाजारां'च्या (इमर्जिंग मार्केट्स) पोर्टफोलिओमध्ये मोडतात. कोणत्या देशात किती भांडवलाची गुंतवणूक करायची हे ठरवताना त्या देशातील शेअर मार्केटमध्ये मिळू शकणाऱ्या परताव्याची तुलना त्याच गटातील इतर देशात मिळू शकणाऱ्या परताव्याशी केली जाते. अधिक परतावा मिळू शकेल अशा देशाला गुंतवणुकीमध्ये प्राधान्य दिले जाते. तुलनेने अनाकर्षक परतावा असेल तर गुंतवणुकी काढूनदेखील घेतल्या जातात. फार कमी वेळात भारतातील कंपन्यांच्या शेअर्सचे भाव बरेच वाढल्यामुळे त्यांचे सरासरी 'पी ई गुणोत्तर' (प्राईस अर्निंग रेशो) २३ पर्यंत वाढले आहे. जे गटातील इतर देशांच्या तुलनेत बरेच जास्त आहे. दुसऱ्या शब्दांत, परकीय गुंतवणूकदारांना भारतातील शेअर्स सध्यातरी महाग वाटत असावेत.

संदर्भ बिंदू शेअर मार्केटमधील गुंतवणूकदार गुंतवणूक/ निर्गुंतवणुकीचे निर्णय घेताना आत्यंतिक एकाकी असतात. ते सामाजिक, पर्यावरण, लोकशाही प्रश्नांचे ओझे वाहायला नकार देतात. ते सतत फक्त एकाच प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात असतात : ''त्यांच्या गुंतवणूक कालपट्टीवर त्यांनी गुंतवणूक केलेले, गुंतवणूक करू इच्छिणारे शेअर्स वधारणार की खाली येणार''. एनडीए सरकारच्या नजीकच्या काळात या प्रश्नाचे उत्तर लवकरात लवकर शोधण्याच्या मानसिकतेत परकीय गुंतवणूकदार संस्था नसाव्यात असे वाटते.

पण त्या भारतापासून फार लांब देखील जाणाऱ्या नाहीत. त्यांच्या दृष्टिकोनातून भारतीय अर्थव्यवस्थेतील गाभ्यातील सामर्थ्ये सध्या देशातील राजकीय सत्ता नक्की कोणाच्या हातात आहे यावर अवलंबून नाहीत. त्या सामर्थ्यांत, देशांतर्गत मोठी बाजारपेठ आणि अजूनही अनेक दशलक्ष कोटी रुपयांच्या भांडवलाची भूक असणारे पायाभूत सुविधा क्षेत्र ही दोन प्रमुख आहेत. येता काळ तरी परकीय गुंतवणूकदार संस्था भारतीय राजकीय सत्तेच्या रंगमंचाच्या विंगेत उभे राहणे पसंत करतील, अशी चिन्हे आहेत.

# ४० नंतर डेटिंगसाठी महत्त्वाच्या टिप्स



४० नंतर डेटिंगच्या जगात प्रवेश करणे कठीण वाटू शकते, परंतु ही एक उत्तम संधी देखील आहे. जीवनाचा अधिक अनुभव आणि स्वत:प्रती स्पष्ट मत यासह तुम्हाला खरोखर पूरक असा जोडीदार शोधण्यासाठी तुम्ही सुसज्ज असल्याचे जाणवते. जीवनाचा हा टप्पा अनेकदा स्थिरता आणि समजूतदारपणा आणतो ज्यामुळे नातेसंबंध अधिक अर्थपूर्ण आणि परिपूर्ण होऊ शकतात. तुम्ही प्रेम, सहवास किंवा तुमच्या छंद सामायिक करण्यासाठी कोणत्यातरी शोधात असल्यास, ४० नंतरचा डेटिंगचा दृश्य विविध प्रकारच्या शक्यता घेऊन येतो.

आपल्याला खरोखर काय हवे आहे याचा विचार करणे आणि आत्मचिंतन करणे आवश्यक आहे

डेटिंगमध्ये जाण्यापूर्वी, आपण नातेसंबंधात काय शोधत आहात यावर विचार करण्यासाठी थोडा वेळ द्या. तुम्ही जीवनसाथी, सोबती किंवा काहीतरी अधिक प्रासंगिक शोधत आहात का? तुमच्या इच्छा समजून घेण्यामुळे तुमच्या डेटिंगच्या प्रवासाचे मार्गदर्शन होईल आणि तुमची उद्दिष्टे संभाव्य भागीदारांना कळवण्यात मदत होईल. जोडीदारामध्ये तुमच्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या गुणांची यादी बनवण्याचा विचार करा आणि तुम्ही ज्यांच्याशी तडजोड करण्यास तयार नाही याची खात्री करुन घ्या. ही आत्म-जागरूकता नवीन नातेसंबंधांवर पुढे नेण्यासाठी कामास येईल.

ऑनलाइन डेटिंग प्रोफाईल तयार करा जे तुम्ही काय आहात हे दर्शवेल

डिजिटल युगात, तुमची ऑनलाइन प्रोफाइल बहुतेकदा तुमचं प्रहिले इम्प्रेशन असतं. तुमच्या प्रोफाइलमध्ये अस्सल आणि सध्याच्या परिस्थितीत जसे आहात तसे रहा आणि तुमच्या आवडी, तसेच तुम्ही जोडीदारामध्ये काय शोधत आहात यासह तुमचा खरा स्वत: दाखवण्यापासून दूर जाऊ नका. तुम्ही काय आहात आणि तुम्हाला काय हवयं हे स्पष्ट दिसू द्या. लक्षात ठेवा खरी प्रोफाइल खर्या लोकांना आकर्षित करते, म्हणून प्रामाणिक राहा आणि तुम्हाला कदाचित इतर लोक सापडतील जे तुमचे खरे कौतुक करतात.

सामाजिक वर्तुळ वाढवा

नवीन क्रियाकलाप करून, कार्यक्रमांना उपस्थित राहून किंवा जुनी मैत्री पुन्हा जागृत करून तुमचे सामाजिक वर्तुळ वाढवा. प्रत्येक नवीन भेट ही एखाद्या खास व्यक्तीला भेटण्याची संभाव्य संधी असते. पारंपारिक डेटिंग स्थळांपुरते मर्यादित राहू नका. क्लबमध्ये सामील होणे, वर्ग घेणे किंवा सोशल सर्व्हिस करण्याचा विचार करा. या क्टिव्हिटींमुळे तुमची आवड आणि मूल्ये शेअर करणाऱ्या समविचारी व्यक्तींशी तुमची ओळख होऊ शकते.


संवाद हे नात्याचे हृदय

अर्थपूर्ण संबंध निर्माण करण्यासाठी प्रभावी संवाद आवश्यक आहे. तुमच्या भावना आणि अपेक्षांबद्दल खुले आणि प्रामाणिक रहा आणि तुमच्या डेटिंगच्या दृष्टीकोनांकडे सक्रियपणे बघा. हे फक्त बोलण्यापुरते नाही; तुमचे विचार सामायिक करणे आणि तुमच्या डेटला काय म्हणायचे आहे ते स्वीकारण्याबद्दल आहे. संवादाचा मजबूत पाया गैरसमज टाळण्यास आणि सखोल संबंध निर्माण करण्यात मदत करू शकतो.

संयम आणि लवचिकता

योग्य जोडीदार शोधताना संयम महत्त्वाचा आहे. अडथळ्यांमुळे निराश होऊ नका; त्याऐवजी प्रत्येक अनुभवाला तुमच्यासाठी योग्य व्यक्ती शोधण्याच्या जवळ एक पाऊल म्हणून समजा. डेटिंग ही चाचणी आणि त्रुटीची प्रक्रिया असू शकते आणि लवचिक आणि आशावादी राहणे महत्वाचे आहे. लक्षात ठेवा, प्रत्येक डेट ही स्वतःबद्दल आणि तुम्ही जोडीदारामध्ये

# कुरूप बदकाची कथा



एका उन्हाळ्याच्या संध्याकाळी एका बदकाला तलावाजवळील झाडाजवळ अंडी घालण्यासाठी चांगली जागा मिळाली. बदकाने तिथे पाच अंडी घातली, पण त्या पाच अंड्यांपैकी एक अंड खूप वेगळं होतं. ते अंडे पाहून बदक अस्वस्थ झाले आणि अंड्यातून पिल्ले बाहेर येण्याची वाट पाहू लागले.

मग एके दिवशी तिच्या चार अंड्यांतून चार लहान बाळं बाहेर आली. ती चार बदकांची पिल्ले खूप गोंडस आणि सुंदर होती. तिची पाचवी अंडी अजून फुटली नव्हती आणि मूल बाहेर आले नव्हते. अशा परिस्थितीत बदकाने सांगितले की, त्याचे पाचवे मूल बाकीच्यांपैकी सर्वात गोंडस आणि सुंदर असेल, त्यामुळेच त्याला बाहेर यायला इतका वेळ लागत आहे.

एके दिवशी सकाळी पाचवे अंडे फुटले आणि त्यातून एक अतिशय कुरूप बाळ बाहेर आले. हे बाळ त्याच्या इतर चार भावंडांपेक्षा मोठा आणि वाईट दिसत होता.

बदक आपल्या कुरूप बाळाला पाहून खूप निराश झाली. भविष्यात हे मूलही आपल्या भावंडांसारखे सुंदर बनेल, अशी आशा तिने व्यक्त केली.

बरेच दिवस झाले आणि बदक अजूनही कुरूप दिसत होती. त्याच्या कुरूपपणामुळे त्याचेच भाऊ-बहीण त्याची चेष्टा करायचे आणि त्याच्याशी खेळतही नव्हते. अशा स्थितीत त्या कुरूप बदकाच्या पिल्ल्याला खूप वाईट वाटू लागले.

एके दिवशी तो कुरूप बदक तलावाजवळ फिरत होता, जेव्हा त्याला तलावात त्याचे प्रतिबिंब दिसले आणि तो विचार करू लागला की जर तो घर सोडून दूर जंगलात कुठेतरी गेला तर त्याचे कुटुंब खूप आनंदी होईल. असा विचार करत तो घनदाट जंगलाकडे निघाला. हिवाळा आला आणि आजूबाजूला बर्फ पडला. आता कुरुप बदकाला थंडी वाजायला लागली होती आणि त्याला खायला काहीच नव्हते.

ते कुरूप बदक तेथून बाहेर आले आणि बदकांच्या कुटुंबापर्यंत पोहोचले, त्यांनी त्याला पळवून लावले. त्यानंतर तो पुढे कोंबड्याच्या घरी गेला पण कोंबड्यानेही त्याला हाकलून दिले. तो रस्त्याने चालायला लागला तेव्हा एका कुत्र्याने त्याला पाहिले पण तोही त्याच्यापासून दूर गेला. हे सर्व पाहून कुरूप बदकाला आश्चर्य वाटले की तो इतका वाईट आहे की कुत्राही त्याच्यापासून दूर पळत आहे आणि त्याला खावसं वाटत नाहीये. दुःखी अंतःकरणाने तो जंगलात परत जाऊ लागला. वाटेत त्याला एक शेतकरी भेटला आणि तो त्याला त्याच्या घरी घेऊन गेला. पण जेव्हा तो शेतकऱ्याच्या घरी पोहोचला तेव्हा मांजरीने त्याला त्रास देण्यास सुरुवात केली, म्हणून कुरूप बदक पळून गेला आणि जंगलात राहायला गेला.

काही वेळातच वसंत ऋतू आला आणि बदकाचे पिल्लू खूप मोठे झाले. एके दिवशी तो नदीच्या काठावर भटकत असताना त्याला एक सुंदर राजहंसिनी दिसली आणि तो तिच्या प्रेमात पडला. पण त्याच्या मनात विचार आला की तो इतका कुरुप आहे, ही राजकन्या त्याच्याशी कधीच बोलणार नाही. शरमेने मान झुकवून तो तिथून निघू लागला.

तिथून जाताना नदीच्या पाण्यात त्याचे प्रतिबिंब दिसले आणि त्याला आश्चर्य वाटले. त्याने पाहिले की तो बऱ्यापैकी वाढला आहे आणि एक सुंदर राजहंस बनला आहे. आता त्याच्या लक्षात आले की तो हंस असल्यामुळे तो आपल्या भावा-बहिणींपेक्षा पूर्णपणे वेगळा होता. त्याचे आता कुरुप बदकाचे रूपांतर राजहंस यात झाले होते, त्यानंतर त्याने हंसिनीशी लग्न केले आणि दोघेही एकत्र आनंदी जीवन जगू लागले.

कुरूप बदकाच्या या कथेतून आपण शिकतो की योग्य वेळ आल्यावर प्रत्येकजण आपली ओळख निर्माण करू शकतो आणि स्वतः ला ओळखू शकतो. तरच तो त्याच्या क्षमतेची चाचणी घेऊ शकतो आणि त्याचे दुःख कमी करू शकतो.

# रिकाम्या पोटी काळे मिठाचे पाणी सेवन केल्यास या ५ समस्यांपासून अराम मिळतो

काळे मीठ शरीरासाठी फायदेशीर असते. जर तुम्ही सकाळी काळे मीठ कोमट पाण्यासोबत सेवन करीत असाल तर यामुळे अनेक समस्या दूर होतात. काळ्या मिठाला सलाड, रायता आणि फळांसाठी जास्त प्रमाणात वापरले जाते.



काळे मीठ हे थंड पदार्थांपैकी एक मानले जाते. जे पोटाला थंड करण्यासोबत शरीरारा इतर आजारांपासून दूर ठेवतो. सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाण्यासोबत काळे मीठ सेवन केल्यास ते आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. कोमट पाण्यामध्ये काळे मीठ टाकून ते सेवन केल्यास यामुळे अनेक फायदे मिळतात. सामान्यतः काळ्या मिठाला सलाड, रायता आणि फळांसाठी जास्त प्रमाणात वापरले जाते.

अनेक लोक काळे मीठ चवीसाठी खातात, पण काळे मीठ असंख्य गुणांनी परिपूर्ण आहे. यामध्ये पोटॅशियम, कॅल्शियम आणि मॅग्नाशीयम प्रमाण सामान्य मिठापेक्षा जास्त असतात. चला जाणून घेऊ या काळे मीठाचे पाणी सेवन केल्यास कोणते फायदे मिळतात.

पाचन मध्ये सुधार

काळ्या मिठाचे पाणी सेवन केल्यास पाचन तंत्र सुरळीत होते. हे पोटामध्ये गॅस, ब्लोटिंग आणि अपचनाची समस्या कमी करते आणि एसिडिटी देखील नियंत्रित ठेवते.

डिटॉक्सिफिकेशन काळे मिठाचे पाणी हे शरीरातील वाईट घटकांना बाहेर काढण्यासाठी मदत करते. काळे मिठाचे पाणी पिल्याने किडनी आणि लिव्हर फंक्शनमध्ये सुधारणा होते. तसेच शरीरातील डिटॉक्स प्रोसेसला जलद करते.

वजन कमी करते काळे मिठाचे पाणी पिल्याने मेटाबॉलिज्म वाढते, ज्यामुळे वजन कमी करण्यासाठी मदत मिळते. हे फॅट कमी करण्यासाठी मदत करते. तसेच भूक देखील नियंत्रित करते.

हाइड्रेशन सकाळी रिकाम्या पोटी काळे मिठाचे पाणी पिल्याने शरीरातील पाण्याची कमी दूर होते. हे इलेक्ट्रोलाइट्सचा बॅलेन्स नीट राहण्यासाठी मदत करते. तसेच डिहाइड्रेशन पासून वाचवते. ताक , दही, रायता मध्ये तुम्ही काळे मीठ मिक्स करून सेवन करू शकतात.

आरोग्यदायी त्वचा काळे मिठाचे पाणी आरोग्यादायी त्वचेसाठी फायदेशीर असते. हे त्वचेची चमक वाढवते आणि मुरूम, पिंपल्स सारख्या समस्या कमी करते. या सोबतच हे त्वचेला डिटॉक्सिफाई करते, ज्यामुळे त्वचा आरोग्यदायी आणि चमकदार बनते. तसेच काळे मिठाचे पाणी सेवन केल्यास रोगप्रतिकात्मक शक्ती वाढते.

# सायकलची सैर



कृष्णाचं त्याच्या वडिलांवर खूप प्रेम होतं आणि वडिलांसाठी तर कृष्णा म्हणजे जीव की प्राण. पण आज कृष्णा वडिलांवर रागवून बसला होता. वडिलांनी संध्याकाळी कामावरून घरी परतल्यावर अंगणात आंब्याच्या झाडाखाली सायकल टेकवली आणि आत येताच त्यांना तोंड फुगवून बसलेला कृष्णा दिसला.

बाबा तुम्हाला तुमच्या कामाशिवाय काहीच दिसत नाही ना!,कृष्णा म्हणाला.

कृष्णाच्या चेहऱ्यावर आणि त्याच्या बोलण्यातून त्याची नाराजगी स्पष्टपणे दिसत होती.

वडील कृष्णाजवळ येऊन बसतात, अरे बाळ उद्या तुझी नवी सायकल नक्की घेऊन येईन, पण आज मला माफी मिळेल तर बरं होईल.

फक्त एका शर्यतीवर माफी मिळणार- रोजप्रमाणे आज पण सायकलची सैर करवली तर...

चला तर असे म्हणत बाबा आणि कृष्णा निघाले मात्र गावाच्या चौकापर्यंत पोहोचता-पोहचता सायकल दोन वेळ खराब झाली. घरी येताना कृष्णा म्हणला, बाबा तुम्ही पण एक नवी सायकल का नाही घेऊन घेतं ? राम म्हणत होतं त्याच्या बाबांनी पण नवी सायकल घेतली आहे... कृष्णाला अरे हो हो असे म्हणत दोघेही गप्पा करत-करत घरी परतले.

दुसर्या दिवशी बाबा घरी परतले तर कृष्णाला सुखद धक्काच बसला. त्याच्यासोबत एक नवी लाल रंगाची चमकदार सायकल होती. कृष्णला दारतच उड्या मारु लागला...

खुश ? वडिलांनी विचारलं.

असं कसं चला बाबा सायकलची एक सैर घेऊन येऊ, आज तुम्ही तुमच्या सायकलवर आणि मी माझ्या... इतकं म्हणत तो अंगणात आला पण हे काय बाबा आज तुमची सायकल कुठे सोडून आला?

# बॉसला 'नाही' म्हणण्याचे ३ सोपे मार्ग



बॉस आणि कर्मचारी यांच्यातील नातेसंबंधात प्रतिष्ठा राखण्यासाठी कर्मचाऱ्याने आपले शब्द विचारपूर्वक वापरणे महत्त्वाचे आहे. अजाणतेपणे त्यांनी असे काहीही बोलू नये ज्यामुळे बॉसला दुखापत होईल आणि त्यांची इच्छा नसतानाही नोकरी गमावू शकते. मात्र कार्यालयात काम करत असताना अनेकवेळा अशी परिस्थिती उद्भवते जेव्हा कर्मचाऱ्याला बॉसला 'नाही' म्हणायचे असते पण बॉसला नाही कसे म्हणायचे हे त्यांना समजत नाही जेणेकरून त्यांना वाईट वाटू नये आणि मुद्दा देखील समजावा.

बऱ्याचदा तुम्हीही या कोंडीत अडकता, म्हणून आज तीन सोप्या पद्धतींबद्दल जाणून घेऊ या, ज्याचा अवलंब करून तुम्ही तुमच्या बॉसला कुशलतेने नाही म्हणू शकता. यामुळे बॉस तुमच्यावर रागावणार नाही, तर त्यांना तुमचा मुद्दाही समजेल.

बॉसला 'नाही' म्हणण्याचे मार्ग

१. बॉसला थेट 'नाही' म्हणणे कठीण आहे. कारण अशात तुम्ही त्यांचा आदेश स्वीकारत नसल्याचे जाणवेल. 'नाही' म्हणण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे तुमच्या बॉसला सांगणे की 'तुम्ही त्यांच्याशी आणि त्यांच्या कल्पनेशी सहमत आहात, परंतु हे काम निर्धारित वेळेत करणे थोडे कठीण आहे.' तुम्ही त्यांना शांतपणे सांगा की तुम्ही सध्या प्रोजेक्टवर काम करत आहात, जे कंपनीसाठी खूप महत्वाचे आहे. अशा प्रकारे तुम्ही तुमचे मत बॉससमोर मांडल्यास त्यांना तुमचा मुद्दा नक्कीच समजेल. तसेच त्यांना वाईटही वाटणार नाही.

२. तुमच्या बॉसला खूश ठेवण्यासाठी तुमची त्यांच्याशी नेहमी चांगली वागणूक असणे सर्वात महत्त्वाचे आहे. प्रत्येक बाबतीत त्यांचा सल्ला घ्या. इतर कर्मचाऱ्यांसमोर त्यांची स्तुती करा. त्यांच्या शब्दांना महत्त्व द्या आणि इ. अशात जेव्हा एखादी परिस्थिती उद्भवते जेव्हा तुम्हाला तुमच्या बॉसला एखाद्या गोष्टीसाठी 'नाही' म्हणावे लागते, तेव्हा सरळ नाही म्हणण्याऐवजी म्हणा, मला या प्रकल्पावर काम करायला आवडले असते, परंतु सध्या माझे लक्ष वर पूर्णपणे लक्ष केंद्रित आहे. जर तुम्ही तुमचे मत अशा प्रकारे व्यक्त केले तर बॉसला वाईट वाटण्याची शक्यता कमी आहे.

३. जर बॉसने तुम्हाला काही विशिष्ट काम करण्यास सांगितले, परंतु तुम्ही ते करू इच्छित नसाल. अशा स्थितीत त्यांना दुसरी कल्पना द्या. उदाहरणार्थ तुम्ही त्यासाठी त्यांना दुसर्या सहकाऱ्याचे नाव सूचवू शकता. याशिवाय तुम्ही म्हणू शकता, मला ही कल्पना खरोखरच आवडली, परंतु जर आम्ही या प्रकल्पावर धोरणात्मकपणे काम केले तर सकारात्मक प्रतिसाद मिळण्याची शक्यता जास्त आहे. अशा स्थितीत तुम्हाला विचार करायला आणखी थोडा वेळ मिळेल.

# राजेश पवार यांना राज्यस्तरीय बहुजनरत्न पुरस्काराने सन्मानित




मुरबाड : – दिनांक ०९जून २०२४, ऋणानुबंध समाज विकास संस्था, चिखली, बुलढाणा द्वारा आयोजित, तुकाराम आश्रम वृद्धाश्रम, सुलोचना माहेरघर, लताई अनाथ आश्रम यांच्या तर्फे राज्यस्तरीय बहुजनरत्न जीवन गौरव पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थित ह.भ.प. धम्मकीर्ती महाराज यांच्या हस्ते : राजेश पवार यांना प्रदान करण्यात आला. यावेळी माजी राज्यमंत्री महाराष्ट्रराज्य डॉ. राजेंद्रजी शिंगणे, श्री विद्याधरजी महाले, सचिव मंत्रालय मुंबई, श्री सिद्धार्थ खरात, सचिव मंत्रालय मुंबई, श्री राहुलजी बोंद्रे माजी आमदार चिखली, श्री प्रशांतभैय्या डोंगरदिवे संचालक, कार्यक्रमाचे आयोजक, तुकाराम आश्रम वृद्धाश्रम भोकर, मा श्री संतोषजी काळे, बालाजी ग्रुप चिखली, श्री. विजय खोलंबे उपाध्यक्ष, भीमाई पतसंस्था मुरबाड, श्री. परेश थोरात युवा कार्यकर्ता मुरबाड व इतर मान्यवर उपस्थित होते., सन्मानपत्र, राज्यस्तरीय बहुजनरत्न जीवन गौरव पुरस्कार २०२४, बाबासाहेबांचे आजोळ मुरबाड येथील आगाशी गावचे सुपुत्र व सामाजिक कार्यकर्ते राजेश शांताराम पवार, यांना त्यांच्या योग्य कामाची योग्य पोहचपावती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. समाजाच्या विविध स्तरातुन त्यांचे अभिनंदन होत आहे.

# तीन वर्षीय मुलीसह महिला बेपत्ता

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक : ९ जून रोजी दुपारी तीन वाजल्यापासून काजल संतोष गोसावी नावाची तीस वर्षीय महिला स्वतःच्या तीन वर्षाच्या मुलीसह बेपत्ता झाली आहे. राहत्या घरापासून स्थानिक परिसर व आप्तेष्ट नातेवाईकांकडे संपर्क साधल्यास तिचा कुठेच ठावठिकाणा सापडत नसल्याने शेवटी जिल्हा छत्रपती संभाजी नगर हद्दीत असलेल्या जवाहर नगर पोलीस स्टेशन येथे बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवण्यास गेलेल्या नातेवाईकांना पोलिसांकडून कोणत्याच प्रकारची दखल घेत नसल्याचा कटू अनुभव आला. दरम्यान स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. व पोलिसांनी तपास यंत्रणा राबवावी अशी मागणी करण्यात येत आहे. सदर महिला कुणालाही आढळल्यास त्वरित या ९२०९०९१७७३ ७२४८९४८०९९ मोबाईल नंबर वर संपर्क साधावा. असे आवाहन नातेवाईकांद्वारे करण्यात आले आहे. या घटनेमुळे पोलिसांचा नाकर्तेपणा पुन्हा एकदा



चव्हाट्यावर आला आहे. महिला व लहान बालिकेसह कोणती दुर्घटना किंवा अपघात घडल्यास पोलीस प्रशासन पूर्णतः जबाबदार राहील व अशा घटनांमुळे जनतेचा रोशाला पोलीस प्रशासनाला सामोरे जावे लागेल. अशी चर्चा सामान्य नागरिकांमध्ये होत आहे.

# प्रियंकासमोर मोदींचा वाराणसीत पराभव झाला असता



नवी दिल्ली : यंदाच्या लोकसभा निवडणुकीतून कॉँग्रेसने जोरदार कमबॅक केले. कॉँग्रेस नेते राहुल गांधी यांनी वायनाड आणि रायबरेली, अशा दोन ठिकाणाहून मोठा विजय मिळवला. यानंतर आज त्यांनी रायबरेलीत आभार सभेचे आयोजन केले. यावेळी प्रियंका गांधीदेखील उपस्थित होत्या. यावेळी बोलताना राहुल यांनी रायबरेली आणि अमेठीच्या कार्यकर्त्यांचे, मतदारांचे आभार मानले, याशिवाय प्रियंका गांधींचे नाव घेत पंतप्रधान मोदींवर बोचरी टीका केली.

राहुल गांधी म्हणाले, रायबरेली आणि अमेठीच्या जनतेने दिलेले प्रेम मी आयुष्यभर विसरू शकत नाही. मी रायबरेलीचा खासदार आहे, पण मी वचन दिले होते की, जो विकास रायबरेलीचा होईल, तोच अमेठीचा होईल. निवडणुकीत भारतातील जनतेने मोदींना प्रत्युत्तर दिले, याची सुरुवात तुमच्यापासून झाली. देशाचे प्रश्न संसदेत मांडले जावेत, अशी माझी इच्छा आहे. गरिबांना मदत करण्याचे राजकारण केले पाहिजे. आता आमची सेना संसदेत बसली आहे, आम्ही विरोधात बसून अग्निवीर योजना रद्द करण्याचा प्रयत्न करू असे राहुल म्हणाले.

वाराणसीत पंतप्रधान कसेबसे वाचले. माझी बहीण प्रियंका वाराणसीतून निवडणूक लढली असती, तर भारताचे पंतप्रधान २ ते ३ लाख मतांनी पराभूत झाले असते. हा माझा अहंकार नाही, तर भारतातील जनतेचा संदेश आहे. जनतेने सांगितले की, त्यांना द्वेष आणि हिंसा नको आहे. राम मंदिराच्या सोहळ्यात एकही गरीब, आदिवासी किंवा दलित नव्हता. तिथे फक्त श्रीमंत लोक होते, म्हणूनच त्यांनी अयोध्येची जागा गमावली, अशी बोचरी टीकाही त्यांनी यावेळी केली.

राहुल पुढे म्हणतात, मोदी म्हणायचे की, देव मला काम करण्याचा आदेश देतो. पण, त्यांच्याकडे असा कोणता देव आहे, जो फक्त अब्जाधीशांसाठी काम करतो. देशातील जनतेने मोदींना संदेश दिला की, त्यांनी संविधानाला हात लावला तर आम्ही काय करू शकतो. २०१४ पासून पंतप्रधान द्वेषाचे राजकारण करत आहेत आणि त्याचे फायदे दोन ते तीन अब्जाधीशांना देत आहेत. काम अजून संपलेले नाही, खुप काम बाकी आहे असेही राहुल यावेळी म्हणाले.

# आंबेडकरी काव्याने क्रांतीचे बिजारोपण केले - पवार





पुणे / प्रतिनिधी :– जग बदलण्याची ताकद असलेल्या आंबेडकरी विचारातून निर्माण झालेल्या साहित्याने , काव्य आणि गीताने क्रांतीचे बिजारोपण केले असून त्यातून मानव मुक्तीची तसेच अन्याय विरोधात लढण्याची ऊर्जा मिळाली डॉ बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने मानवतेच्या कल्याणासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले त्यांची प्रेरणा हाच आमचा ध्यास श्वास विकास असून देशातील व परदेशातील विविध भाषेत त्यांच्या कार्याचा गौरव त्यांच्या अनुयायांनी काव्य आणि गितादवारे केला.या काव्याचे संकलन जतन संवर्धन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या संकल्पनेतून होत आहे. ही क्रांतिकारी घटना असून आंबेडकरी काव्यांनी क्रांतीचे बिजारोपण केले असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत लेखक ज वि पवार यांनी व्यक्त केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक १० जुन २०२४ रोजी भीम महाकाव्य या महत्वपूर्ण प्रकल्पाचा आढावा बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ज्येष्ठ साहित्यिक ज वि पवार, व सुबोध मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.ज वि पवार यांना नुकताच उतर अमिरेकेतील आंबेडकराईट असोसिएशनचा विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री वारे यांच्या हस्ते त्यांना भारतीय राज्यघटनेची प्रत, पुष्पगुच्छ भेट देऊन सन्मान करण्यात आला. मान्यवराच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी भीम महाकाव्य प्रकल्पाविषयी मागदर्शन करताना मा महासंचालक म्हणाले की, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील जनतेला स्वातंत्र्य समता बंधुभाव व न्याय दिला त्यांच्यामुळेच आमच्या जिवनात क्रांती झाली. त्यांच्या महान कार्याचा प्रसार आणि प्रचार कवी शाहीर आणि अनुयायांनी वेगवेगळ्या प्रबोधनाच्या माध्यमातून केला त्यामुळेच आंबेडकरी चळवळीचा प्रसार झाला. आंबेडकरी चळवळीचे आधारवड साहित्यिक ज वि पवार यांनी चळवळीची एक पिढी घडवली त्यांचे साहित्य काव्य आम्हाला प्रेरणादायी असून बार्टी भीम महाकाव्यद्वारे संकलन , जतन संवर्धन करुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करणार असल्याचे प्रतिपादन श्री वारे यांनी केले. याप्रसंगी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले वषाली शिंदे, अनिल कांरडे, शुभांगी पाटील यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रकल्प व्यवस्थापक डॉ प्रेम हनवते यांनी केले. आभार प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी मानले.

# अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी विविध योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

लातूर : – अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२४–२५ अंतर्गत फुलपिक लागवड, मशरुम उत्पादन, हरीतगृह, शेडनेट हाऊस, प्लॅस्टिक मल्चिंग, २० एचपी टॅक्टर, शेतकरी अभ्यास दौरा, सामूहिक शेततळे, वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण, कांदाचाळ, पॅक हाऊस व प्राथमिक प्रक्रिया केंद्र आदी बाबींचा लाभ देण्यात येणार आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव यांनी केले आहे. ऑनलाईन अर्ज करताना महा–डीबीटी पोर्टलचे या संकेतस्थळावरील शेतकरी योजना हा पर्याय निवडावा. तसेच संगणक, लॅपटॉप, सामुदायिक सेवा केंद्र (सीएससी), ग्रामपंचायतीमधील संग्राम केंद्र इत्यादी माध्यमातून ऑनलाईन अर्ज करता येतील. पोर्टलवर अर्ज करण्यासाठी लागणारी सातबारा, आठ अ, बँक पासबुक व आधारकार्ड लिंक असलेला मोबाईल क्रमांक सोबत असणे आवश्यक आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. जाधव यांनी केले आहे.

# देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्त्वाखाली भारत देश महासत्ता बनेल - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर – २०१४ नंतर २०१९ आता तिसर्यांदा मोदी ३.० च्या पर्वाला सुरुवात झालेली आहे. नरेंद्र मोदीजी यांच्या विचारावरती देशाला व त्रिलोकातील बांधवांना सत्शिल, सदाचारी बवून राष्ट्रउभाणीचे कार्य आत्मश्विासाने करण्याची शिकवण भगत्गिता, रामायण या ग्रंथातून देण्याचे कार्य केले. राष्ट्रभक्त स्वामी विवेकानंदजीच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर असल्यामुळे ४५ तासांची ध्यानधारणा करून तिसर्यांदा नरेंद्र मोदीजी यांनी भारत देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतलेली आहे. हा ऐतिहासिक राष्ट्रपतीभवनामध्ये झालेला शपथविधी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडलेला आहे. यावेळी मोदीजी सोबत एनडीएसह ७१ मंत्र्यांनी शपथ घेतली. यामध्ये ३० कॅबीनेट मंत्री, ५ राज्यमंत्री(स्वतंत्र प्रभार) आणि ३६ राज्यमंत्री यांनी शपथ घेतली आहे. त्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्त्वाखाली भारत देश महासत्ता बनेल यासाठी एनडीए आघाडीतील मा.चंद्राबाबू नायडू, मुख्यमंत्री नितीश कुमारजी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.एकनाथरावजी शिंदे साहेब यांनी राष्ट्रनिर्मितीसाठी मोदी साहेबांना बिनशर्त पाठिंबा दिला. या बद्दल एनडीए आघाडीतील घटक पक्षाचेही अभिनंदन व आभार मानले पाहिजे. अशी प्रतिक्रिया भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव



पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केली. गेल्या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी राष्ट्र आणि देशहिताला प्राधान्य देऊन कार्य केलेले आहे. यापुढील कालावधीतही एनडीए सोबत त्यांना देशहिताचे अनेक निर्णय घेण्याचा संकल्प ठरविला असून तोही पूर्ण होऊन भारत देश महासत्ता बनेल असा विश्वासही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला.

# उड्डाणपुलाची कामे नऊ महिन्यांपासून बंदच रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाला अंदाजपत्रकात मान्यता

> रेल्वे पटरी ओलांडून गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना न्यावे लागते. एखादा रुग्ण गंभीर असेल तर त्यास संदर्भसेवा देत आदिलाबाद येथे रेफर केले जाते.

> अशावेळी रेल्वे गेट पडले तर रुग्णवाहिका दहा ते पंधरा मिनिटे किंवा कधी कधी त्यापेक्षा अधिक वेळ थांबते. मालगाडी येत असेल तर अर्धा तासाच्या वर वेळ लागतो. यामुळे आदिलाबाद येथे दवाखान्यात वेळेवर रुग्ण पोहोचत नाही. त्यामुळे कित्येक रुग्णांना दवाखान्यात पोहोचण्यापूर्वी प्राण गमवावे लागले.

किनवट / शेख शौकत :– राष्ट्रीय महामार्गावर गोकुंदा येथे रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाला अंदाजपत्रकातच मान्यता आहे. पण, एजन्सीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या मदतीने इकोसेन्सेटिव्ह झोनच्या नावाखाली कामच हाती घेतले नाही. अशाही परिस्थितीत जुलै २०२३ मध्ये पुन्हा उड्डाणपुलाला परवानगी मिळूनही गेल्या नऊ महिन्यांपासून कामच हाती घेतले नाही. त्यामुळे हा चालढकलपणा कशासाठी, असा प्रश्न निर्माण झाला आहे. नांदेड, भोकर, हिमायतनगर, किनवट, माहूर, धनोडा, आर्णी या राष्ट्रीय महामार्ग क्रं.१६१ ए कोठारी ते किनवट, माहूर, धनोडा, आर्णी या राष्ट्रीय महामार्गावर किनवट ते गोकुंदा दरम्यान रेल्वे गेट असून, येथे रेल्वे उड्डाणपूल महामार्गाच्या कामातच मंजूर आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पैनगंगा अभयारण्य पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सेटिव्ह झोनच्या नावाखाली उड्डाणपुलाच्या कामाला हात लावला नाही. राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपुलाचे काम करण्यासाठी एजन्सीने एक्सटेन्शन घेतले. चार वर्षे काढले आता रेल्वेचे अडथळे, इंजिनिअर यायचा आहे असे म्हणत नवीन भावाने रेल्वे उड्डाणपूल करण्याचा एजन्सीचा मनसुबा असल्याचे बोलले जात आहे. २०१७ ला या राष्ट्रीय महामार्गाचे टेडर निघाले. त्यानंतर २०२२ पर्यंत एक्सटेन्शन देण्यात आले. तरी उड्डाणपुलाचे काम हाती घेण्यात आले नसल्याने ही एजन्सी किनवटरांना बनवू पाहात आहे की, गुंडाळपट्टी करून पळून जाण्याच्या प्रयत्नात आहे, हे समजायला मार्ग नाही. असे असलेतरी किनवटचे लोकप्रतिनिधी का लक्ष देत नाहीत ? आरओबीचे काम रेंगाळल्याने रेल्वे गेट पडताच वाहतुकीची कोंडी होत आहे. राष्ट्रीय महामार्गाचे काम किनवट शहरात निर्धारित रुंदीत करण्यात यावे, रेल्वे उड्डाणपुलाचे काम हाती घेण्यात यावे म्हणून गेल्या चार वर्षांपासून नागरिकांचा पाठपुरावा सुरू आहे.

# विवेकानंद रुग्णालय आजही सुसंस्कारीत स्वास्थ्य सेवेचे केंद्र आहे : डॉ. अशोकराव कुकडे

लातूर : विवेकानंद रुग्णालय हे आजही सुसंस्कारीत स्वास्थ्य सेवेचे केंद्र आहे, हे संस्काराचे फलित असल्याचे प्रतिपादन विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक पद्मभूषण डॉ.अशोकराव कुकडे काका यांनी केले. मातोश्री वृद्धाश्रम परिसरात झालेल्या या कार्यक्रमात ' विवेकानंद वार्ता ' या त्रैमासिकाच्या विशेषांकाचे विमोचनही करण्यात आले. विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक विश्वस्त डॉ. महेश मोरेश्वर देवधर यांचा अमृत महोत्सव नुकताच पद्मभूषण डॉ. कुकडे काका, पुण्याचे माजी खासदार प्रदीप रावत, ज्येष्ठ विधिज्ञ शरदराव चंद्रचूड आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच मातोश्री वृध्दाश्रम येथे साजरा करण्यात आला. डॉ.देवधर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मातोश्री वृद्धाश्रम परिसरातील नवीन इमारतीतील ' श्रीराम सभागृह' चे उद्घाटनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनात डॉ. कुकडे म्हणाले की, डॉ. महेश देवधर यांचे सेवेसाठी समर्पित असलेले जीवन भावी पिढीसाठी निश्चितच पथदर्शक व मोलाचे शिक्षण देणारे आहे. सेवा करताना स्थळ, वेळ, आकारमान यापेक्षा तुमच्या भावना सर्वाधिक महत्वाच्या असतात, असेही डॉ. कुकडे म्हणाले.

शरदराव चंद्रचूड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना १९७५– ७६ च्या काळात लातूरसारख्या दुर्गम भागात वैद्यकीय सेवा देण्याचा डॉ. महेश देवधर यांचा निर्णय भावूक असू शकतो. पण आयुष्यभर समर्पित निष्काम सेवा देण्याचे दुर्मिळ काम त्यांनी केले, ही बाब सर्वांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. माजी खासदार प्रदीप रावत यांनी यावेळी बोलताना डॉ. कुकडे काकांसारखा दीपस्तंभ, डॉ. देवधरांसारखा जीवनव्रती यांचा समर्पित सेवाभाव, तत्वनिष्ठा , प्रामाणिकता या सर्वांचे मूळ संघ संस्कारात असल्याचे सांगितले. आजचा प्रगतीशीलपुरोगामी हिंदू समाज हा प्रबोधन युगाची देणगी आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE